# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- ३४०** **दिनांक :- ०३/१२/२०२१**

## चारित्र्याच्या संशयावरुन पत्नीचा खून करुन पर-राज्यात पळून जाणा-या आरोपीतास १२ तासांच्या आत अटक.

वालीव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २९/११/२०२१ रोजी १०.४५ वा. सूमारास सौ. निलमदेवी रमेश महतो वय २७ वर्षे हिस अज्ञात कारणावरुन मोबाईल चार्जर केबल तसेच मिक्सरचे केबलच्या सहाय्याने गळा आवळुन जिवे ठार मारले म्हणुन तिचे पती विरुद्ध गुन्हा रजि. I १३६४/२०२१ भादंविसं कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ अधिकारी यांनी लागलीच वालीव गुन्हे प्रकटिकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांना सुचना केल्या. सदर सूचनेप्रमाणे वालीव पोलीस ठाण्याचे गून्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी त्यांचे गूप्त बातमीदार तसेच तांत्रीक बाबींच्या आधारे सूक्ष्म विश्लेषन करुन आरोपीत यास गुजरात राज्य सूरत या ठिकाणावरुन ताब्यात घेवून त्याचेकडे विचारपूस करता त्याने गून्हाची कबूली दिल्याने त्यास ताब्यात घेतले.

आरोपीताकडे अधिक चौकशी केली असता त्याने सांगितले की, त्याची पत्नी हिचे कोणत्यातरी बाहेरील पूरुषाशी अनैतिक संबंध असल्याचे कारणांवरुन त्यांचेमध्ये नेहमी वाद होत होते. सदर कारणावरुन पत्नीबद्दल द्वेष निर्माण होवून त्याच वादातुन आरोपी याने मोबाईल चार्जर केबल तसेच मिक्सरची केबलच्या सहाय्याने गळा आवळुन जिवे ठार मारुन अटक टाळण्यासाठी गुजरात येथे पळुन गेला होता. सदरील गुन्हा दाखल झाल्यापासून यातील आरोपी नामे रमेश महतो हा पळून गेल्यानंतर त्यास वालीव पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने १२ तासाचे आत ताब्यात घेवून अटक केली आहे.

वरील कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ - २ वसई, श्री. पंकज शिरसाट, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. राहुलकुमार पाटील व गुन्हे प्रकटिकरण शाखेचे सपोनि/ज्ञानेश फडतरे, पो.उप.निरी. मनुरोध राठोड, पोहवा/मुकेश पवार, मनोज मोरे, सचिन दोरकर, किरण म्हात्रे, सतिष गांगुर्डे, राजेंद्र फड, पो.अंम. अमोल बर्डे गजानन गरीबे पो.अं./सूर्यकांत मूंढे, जयवंत खंडवी. यांनी पार पाडली आहे.

----ooo---